# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.02.2026** **वारःसोमवार**

---

•राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबईत

•येत्या ६ मार्चला अर्थसंकल्प मांडण्यात येणार, मुख्यमंत्र्यांची माहिती

•जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याच्या दृष्टीनं एआय इम्पॅक्ट समिट महत्त्वाचा टप्पा ठरल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

•एआय फॉर ॲग्री २०२६ परिषदेचं मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन; कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ॲप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचं लोकार्पण

आणि

•टी ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेच्या सुपर एट सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेचा भारतावर ७६ धावांनी, तर इंग्लंडचा श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय

**<u>विधीमंडळअधिवेशन</u>**

राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबईत सुरु होत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होईल. त्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर केला जाईल. येत्या ६ मार्चला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी पत्रकार परिषद घेत आपापल्या भूमिका मांडल्या. सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. प्रचंड बहुमतामुळे सत्ताधारी पक्षाचं वर्तन सभ्यपणाचं नाही, जिथं लोकशाहीचा मान राखला जात नाही तिथं आपण चहापानाला जाणार नाही असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितलं. भारत- अमेरिका करार हा पूर्णपणे शेतकरी विरोधी असल्याची टीका जाधव यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती

मृत्यूबाबतही अनेक शंका आहेत, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातली बेरोजगारी, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, रखडलेले विकास प्रकल्प, शेतमालाला मिळणारा अल्प मोबदला या आणि इतर मुद्द्यांवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी टीका केली. माजी मंत्री आदित्य ठाकरे, सतेज पाटील यावेळी उपस्थित होते.

**<u>फडणवीसअधिवेशन</u>**

राज्याच्या येत्या अर्थसंकल्पामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अपेक्षित असलेले सर्व मुद्दे, सूचना अंतर्भूत करण्यात येतील. तसंच जनसामान्यांना दिलासा देण्यासोबतच आर्थिक शिस्त देखील पाळली जाईल. यासाठी आवश्यकता वाटल्यास काही कडक पावलंही उचलली जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १५ विधेयकं मांडण्यात येणार असून येत्या ६ मार्चला अर्थसंकल्प मांडला जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि सुनेत्रा पवार यावेळी उपस्थित होते.

**<u>मनकीबात</u>**

आगामी काळात जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कशा पद्धतीनं केला जाईल, या दृष्टीनं नवी दिल्लीत नुकतीच पार पडलेली इंडिया एआय इम्पॅक्ट समिट एक महत्त्वाचा टप्पा ठरल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाच्या 131व्या भागात, काल त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. या शिखर परिषदेत संपूर्ण जगाला भारताची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील अद्भुत क्षमता पाहायला मिळाली; यातला तरुणांचा सहभाग उत्साहवर्धक होता, असं ते म्हणाले.

भारतीय नागरिक कुठेही गेले, तरी आपली मातृभूमी आणि आपली कर्मभूमी अशा दोन्ही देशांच्या विकासात हातभार लावतात, असं मोदी म्हणाले. यासाठी, सध्या सुरू असलेल्या टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, विविध देशांच्या संघातील भारतीय वंशाच्या खेळाडूंचं उदाहरण पंतप्रधानांनी दिलं.

आज देश गुलामीच्या प्रतीकांना मागे टाकून भारतीय संस्कृतीशी संबंधित गोष्टींना महत्त्व देऊ लागला आहे. याच दिशेनं पुढचं पाऊल म्हणून आज, २३ फेब्रुवारीला राष्ट्रपती भवनात सी. राजगोपालाचारी यांच्या प्रतिमेचं

अनावरण होईल, अशी माहिती त्यांनी दिली. ब्रिटीश वास्तुविशारद एडविन यांच्या प्रतिमेऐवजी राजाजींची प्रतिमा तिथे लावली जाईल असं त्यांनी सांगितलं.

देशात अवयवदानाविषयीची जागरूकता सातत्यानं वाढत असल्याचं सांगत, केरळमधील अवघ्या दहा महिन्यांच्या बाळाच्या पालकांनी अवयवदानाचा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. अवयवदानाबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले...

ऑनलाईन फसवणुक, डिजिटल अरेस्ट याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढली आहे, मात्र अजूनही फसवणुकीची प्रकरणं घडत आहेत, त्यामुळे सगळ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन त्यांनी केलं.

शेतीमध्ये पारंपरिक पद्धतीबरोबरच तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन आणि उत्पन्न वाढवणाऱ्या शेतकऱ्यांची उदाहरण त्यांनी सांगितली.

रमझान आणि होळीसारख्या सणाला स्वदेशी उत्पादनांची खरेदी करून आत्मनिर्भर भारत अभियानात योगदान देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**Intro**

**कृषिएआय**

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल मुंबईत आयोजित एआय फॉर अ‍ॅग्री २०२६ शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. “महा-एजी-एक्स” हा राज्याचा डेटा प्लॅटफॉर्म, तसंच महाविस्तार ॲपचं लोकार्पण यावेळी करण्यात आलं. कृषि क्षेत्राशी निगडीत महत्त्वपूर्ण सामंजस्य करारही यावेळी करण्यात आले.

शेतकऱ्यांनी डिजिटल सेवांचा आत्मविश्वासानं वापर केला पाहिजे, असं सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले....

कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास भारताच्या कृषी क्षेत्राला अर्थव्यवस्थेत ७० हजार कोटी रुपयांपर्यंतचे योगदान मिळू शकतं, असं मत केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी यावेळी व्यक्त केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर आदी यावेळी उपस्थित होते.

**महाआरोग्य**

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, डॉक्टर, पत्रकार, आरोग्य कर्मचारी तसंच तळागाळातील आरोग्य घटकांचा गौरव करण्यासाठी 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार' आणि 'महाआरोग्य सन्मान २०२६' या पुरस्कारांचे वितरण राज्याच्या आरोग्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते काल मुंबईत करण्यात आलं. या कार्यक्रमात महाराष्ट्र पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रमाचा शुभारंभ आणि 'मेनोपॉज क्लिनिक' उपक्रमाचं राज्यस्तरीय लोकार्पण देखील करण्यात आलं.

**शरदपवार**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांना काल पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अशक्तपणा जाणवत असल्यानं त्यांना पुण्यातील एका खासगी रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात आलं आहे. पुढील वैद्यकीय तपासणीनंतरच त्यांच्या प्रकृतीबाबतची अधिकृत माहिती जाहीर केली जाणार आहे.

संत निरंकारी मिशनच्या वतीनं 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचं आयोजन काल देशभरात विविध ठिकाणी करण्यात आलं होतं. देशातील ९३० शहरांमधील १६ शे हून अधिक ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. या

अभियानाच्या अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल अहमदाबाद इथं झालेल्या सुपर एट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघानं भारतीय संघाचा ७६ धावांनी पराभव केला. दक्षिण आफ्रिकेनं प्रथम फलंदाजी स्वीकारत निर्धारित २० षटकात सात बाद १८७ धावा केल्या. त्यामध्ये डेव्हिड मिलरच्या तडाखेबंद ६३ धावांचा तसेच ट्रस्टन स्टब्जच्या ४४ धावांचा समावेश होता. या धावांचा पाठलाग करताना यजमान संघाचा डाव १८ षटकं आणि पाच चेंडूत १११ धावांवर आटोपला. मार्को जेसननं चार तर केशव महाराज यानं तीन गडी बाद करून आपल्या संघाच्या विजयात मोठा हातभार लावला. श्रीलंकेत पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या गट २ मधील आणखी एका सुपर एट सामन्यात इंग्लंडनं श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवला.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात हवामान कोरडं राहील.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.